
जनसंपर्क कक्ष
4 APR 2018 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाकडून गौरव : १३ एप्रिलला वितरण

# जब्बार पटेल यांना 'कणबरकर' पुरस्कार

लोकमत न्यूज नेटवर्क



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांना यावर्षीच्या 'प्राचार्य रा. कृ. कणबरकर' पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. १ लाख ५१ हजार रुपये, मानपत्र, स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. त्याचे वितरण दि. १३ एप्रिलला दुपारी चार वाजता विद्यापीठातील वि. स. खांडेकर भाषाभवनमध्ये होणार आहे, अशी माहिती कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे व निवड समितीचे सदस्य आणि ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली.

## प्रतिभाशाली दिग्दर्शक

पंढरपूर येथे जन्मलेल्या पटेल यांची प्रतिभाशाली, सर्जनशील दिग्दर्शक अशी ओळख आहे. घाशिराम कोतवाल, तीन पैशांचा तमाशा, अशी पाखरे येती, आदी नाटके तसेच सामना, सिंहासन, जैत रे जैत, मुक्ता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, यशवंतराव चव्हाण: बखर एका वादळाची, एक होता विदूषक, असे मराठीतील संस्मरणीय चित्रपट त्यांनी दिग्दर्शित केले आहेत. वेगळा विषय, वेगळा आशय, वेगळी मांडणी ही त्यांची वैशिष्ट्ये आहेत. त्यांनी थिएटर ॲकेडमी नावाच्या प्रयोगात्मक नाट्यसंस्थेची स्थापना केली. कुसुमाग्रजांवरील लघुपटासह इंडियन थिएटर, लक्ष्मण जोशी, मी एस. एम., असे काही महत्त्वाचे लघुपट त्यांनी निर्माण केले आहेत. त्यांनी नाटकांमध्ये भूमिका केल्या आहेत.

कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, पुरस्कार निवड समितीच्या सदस्यांनी त्यांच्याकडे दाखल झालेल्या तीन प्रस्ताव आणि अन्य समिती सदस्यांनी सुचविलेल्या नावांतून ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक डॉ. पटेल यांची यावर्षीच्या पुरस्कारासाठी निवड केली. विद्यापीठ आणि शालिनी कणबरकर यांच्यातील सामंजस्य करारानुसार माजी कुलगुरु व प्राचार्य रा. कृ. कणबरकर यांच्या स्मरणार्थ या पुरस्काराची निर्मिती केली आहे. भाषा, साहित्य, शास्त्र, सामाजिक व नैसर्गिक, कला, क्रीडा, समाजसेवा, सामाजिक हिताचे लक्षणीय काम करणारी व्यक्ती अथवा संस्थेच्या कार्यवाहीचा आढावा घेऊन त्यांना पुरस्कार दिला जातो. पहिला पुरस्कार भारतरत्न डॉ. सी. एन. राव यांना, तर दुसरा पुरस्कार रयत शिक्षण संस्थेला दिला होता. पुरस्कार प्रदान कार्यक्रमावेळी डॉ. राव, 'रयत'चे कार्याध्यक्ष अनिल पाटील आणि आता डॉ. पटेल यांच्या भाषणाची पुस्तिका तयार केली जाणार आहे. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. पाटील म्हणाले, रंगभूमी आणि चित्रपटांमध्ये डॉ. पटेल यांनी कलात्मक दिग्दर्शन केले आहे. त्यांनी नाट्य, चित्रपटांतून सामाजिक संघर्षाचे मुद्दे मांडले आहेत. त्याच्या योगदानाची दखल घेत पुरस्कारासाठी निवड केली आहे. पत्रकार परिषदेस प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, निवड समिती सदस्य प्राचार्य बी. एन. खोत, डॉ. भालबा विभूते, एन. व्ही. चिटणीस, विलास सोयम उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
4 APR 2018 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांना प्राचार्य कणबरकर राष्ट्रीय पुरस्कार

## शिवाजी विद्यापीठात १३ रोजी पुरस्कार प्रदान सोहळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**



शिवाजी विद्यापीठातर्फे प्रदान करण्यात येणारा प्रतिष्ठेचा प्राचार्य आर. के. कणबरकर राष्ट्रीय पुरस्कार यंदा ज्येष्ठ नाट्य व चित्रपट दिग्दर्शक जब्बार पटेल यांना जाहीर करण्यात आला आहे. दि. १३ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजता वि. स. खांडेकर भाषा भवन येथे पुरस्कार प्रदान सोहळा होणार आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

माजी कुलगुरू प्राचार्य रा. कृ. कणबरकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कारासाठी त्यांच्या कुटुंबीयांनी विद्यापीठाकडे २५ लाख रुपयांची ठेव प्रदान केली आहे. शालिनी कणबरकर यांच्यासमवेत झालेल्या सामंजस्य करारातून त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ 'प्राचार्य आर. के. कणबरकर पुरस्कारा'ची संयुक्त निर्मिती करण्यात आली. देशातील शैक्षणिक, साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा व अन्य क्षेत्रांत उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या व्यक्तीस प्राचार्य कणबरकर यांच्या स्मृतिदिनी दरवर्षी पुरस्कार देण्यात येतो. १ लाख ५१ हजार रोख, स्मृतिचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे. यापूर्वी ज्येष्ठशास्त्रज्ञ भारतरत्न डॉ. सी. एन. आर. राव व रयत शिक्षण संस्थेला प्रदान करण्यात आला आहे.


पुरस्कार शोध समितीचे सदस्य डॉ. जे. एफ. पाटील म्हणाले, कुलगुरूंच्या अध्यक्षतेखालील शोध समितीने डॉ. जब्बार पटेल यांच्या भारतीय नाट्य-चित्रपट क्षेत्रांतील योगदान व भारतीय समाजासाठी केलेल्या सेवेची दखल घेऊन पुरस्कारासाठी त्यांची एकमताने निवड केली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शोध समितीचे सदस्य प्राचार्य डॉ. बी. ए. खोत, डॉ. भालबा विभुते, डॉ. एन. व्ही. चिटणीस, उपकुलसचिव विलास सोयम उपस्थित होते.

### प्रतिभाशाली दिग्दर्शक

*पंढरपूर येथे १९४२ रोजी जन्मलेल्या डॉ. जब्बार पटेल यांची एक प्रतिभाशाली आणि सर्जनशील दिग्दर्शक म्हणून ओळख आहे. घाशिराम कोतवाल, तीन पैशांचा तमाशा, अशी पाखरे येती यासारख्या अजरामर नाटकांद्वारे त्यांनी मराठी नाट्यसृष्टीला वेगळ्या उंचीवर नेण्याचे काम केले. बहुआयामी कर्तृत्वाच्या डॉ. पटेल यांचे राठी रंगभूमीच्या वाटचालीत योगदान आहे. सामना, सिंहासन, जैत रे जैत, मुक्ता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, यशवंतराव चव्हाण: बखर एका वादळाची, असे मराठीतील संस्मरणीय चित्रपट पटेल यांनी दिग्दर्शित केले आहेत. वेगळा विषय, आशय, मांडणी हे पटेल यांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य राहिले आहे.*

4 APR 2018 महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. पटेल यांना कणबरकर पुरस्कार



डॉ. जब्बार पटेल

कोल्हापूर : 'शिवाजी विद्यापीठाच्यावतीने प्रदान करण्यात येणारा प्रतिष्ठेचा प्राचार्य रा. कृ. कणबरकर राष्ट्रीय पुरस्कार यंदा ज्येष्ठ निर्माते-दिग्दर्शक जब्बार पटेल यांना जाहीर करण्यात आला. येत्या १३ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजता शिवाजी विद्यापीठाच्या भाषा भवन सभागृहात पटेल यांना सन्मानपूर्वक पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे,' अशी माहिती शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू दिवंगत प्राचार्य रा.कृ. कणबरकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार देण्यासाठी शालिनी कणबरकर आणि कुटुंबियांनी शिवाजी विद्यापीठाकडे २५ लाख रुपयांचा निधी दिला आहे. त्यातून कणबरकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ 'प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार'देण्यात येतो. देशातील शैक्षणिक, साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा तसेच अन्य क्षेत्रांत अत्युच्च कामगिरी बजावणाऱ्या व्यक्तीला हा पुरस्कार देण्यात येतो. एक लाख, ५१ हजार रोख, स्मृतिचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरुप आहे. यापुर्वी प्रथम पुरस्कार ज्येष्ठ शास्त्रज्ञ भारतरत्न डॉ. सी. एन. आर. राव यांना तर गतवर्षी दुसरा पुरस्कार रयत शिक्षण संस्थेला प्रदान करण्यात आला होता. यंदा ज्येष्ठ निर्माते-दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांची निवड करण्यात आली आहे.

यावेळी शोध समितीचे सदस्य डॉ. जे. एफ. पाटील, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शोध समितीचे सदस्य प्राचार्य डॉ. बी. ए. खोत, डॉ. भालबा विभुते, डॉ. एन. व्ही. चिटणीस, उपकुलसचिव विलास सोयम उपस्थित होते.

### भाषणांची पुस्तिका प्रकाशित होणार

गेल्या तीन पुरस्कार सोहळ्यातील डॉ. राव, रयत शिक्षण संस्था व यंदाच्या डॉ. पटेल यांच्या भाषणाचे संकलन असलेल्या पुस्तिकेचे प्रकाशनही यानिमित्ताने करण्यात येणार आहे. या भाषणात संबोधित करण्यात आलेल्या विचारांचा संग्रह म्हणून ही पुस्तिका मार्गदर्शक ठरेल असा विश्वास डॉ. शिंदे यांनी व्यक्त केला.

### डॉ. जब्बार पटेल यांच्याविषयी

पंढरपूर येथे २३ जून, १९४२ रोजी जन्मलेल्या डॉ. जब्बार पटेल यांची एक अत्यंत प्रतिभाशाली आणि सर्जनशील दिग्दर्शक ओळख आहे. 'घाशीराम कोतवाल', 'तीन पैशांचा तमाशा', 'अशी पाखरे येती' यांसारख्या अजरामर नाटकांद्वारे जब्बार पटेल यांनी मराठी नाट्यसृष्टीला एका वेगळ्या उंचीवर नेण्याचे काम केले. उत्तम अभिनेते, निर्माते आणि प्रयोगशील दिग्दर्शक अशा बहुआयामी कर्तृत्वाच्या डॉ. पटेल मराठी रंगभूमीच्या वाटचालीत अतुलनीय योगदान दिले आहे. त्याचप्रमाणे 'सामना', 'सिंहासन', 'जैत रे जैत', 'मुक्ता', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर', 'यशवंतराव चव्हाणः बखर एका वादळाची' असे मराठीतील संस्मरणीय चित्रपट पटेल यांनी दिग्दर्शित केले आहेत.

### १३ एप्रिल रोजी शिवाजी विद्यापीठात सोहळा

4 APR 2018
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. जब्बार पटेल यांना ‘कणबरकर पुरस्कार’

## कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांची माहिती : १३ रोजी शिवाजी विद्यापीठात होणार पुरस्कार वितरण

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातर्फे देण्यात येणारा राष्ट्रीय ‘प्राचार्य आर. के. कणबरकर पुरस्कार’ यंदा ज्येष्ठ नाट्य व चित्रपट दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांना जाहीर करण्यात आला आहे. दि. १३ रोजी दुपारी ४ वाजता विद्यापीठातील भाषा भवन येथील वि. स. खांडेकर सभागृहामध्ये पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे. १ लाख ५१ हजार रूपये रोख, स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, डॉ. जब्बार पटेल यांना वयाच्या दहाव्या वर्षापासूनच नाटकात काम करण्याची आणि नाट्यदिग्दर्शनाची संधी मिळाली. शाळेत असताना ‘चाफेकर’, ‘हाडाचा झुंजार आहेस तू’ ही मूकनाट्य व महाविद्यालयीन जीवनात ‘तूझे आहे तुजपाशी’मध्ये श्यामची भूमिका केली. जब्बार पटेल हे बालरोगतज्ज्ञ होते. दवाखान्यात दिवसभर प्रॅक्टिस करून संध्याकाळी ‘घाशीराम’च्या रंगीत तालमीसाठी पुण्याला यायचे. कवी रामदास फुटाणे यांनी त्यांची भेट घेऊन ‘सामना’ या चित्रपटाची पटकथा दाखवली. त्यांनी तेंडूलकरांच्या परवानगीने पहिल्यांदाच ‘सामाना’ या चित्रपटाचे दिग्दर्शन १९७४ मध्ये केले. पुढे त्यांनी ‘सिंहासन’, ‘जैत रे जैत’, पु. ल. देशपांडे यांनी लिहलेला ‘एक होता विदूषक’ अशा राजकीय चित्रपटांचे



दिग्दशन केले. ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर’ चित्रपटाचा प्रस्ताव आल्यानंतर त्यांनी तातडीने हा चित्रपट स्वीकारला. या चित्रपटासाठी तत्कालीन केंद्र सरकारने ५ कोटी व राज्य सरकारने १ कोटीचा निधाही मंजूर केला. या चित्रपटाला १९९९ चा सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कारही प्राप्त झाला आहे. डॉ. पटेल ‘थिएटर ॲकॅडमी’ या नाट्यसंस्थेची स्थापना केली. सध्या त्यांचे ‘महात्मा फुले’ यांच्या जीवनावर २०१२ पासून चित्रपट काढण्याचे काम सुरू आहे. तसेच पटेल यांना २०१४ मध्ये ‘अखिल महाराष्ट्र नाट्यमंदिर समितीतर्फे विष्णुदास भावे गौरव पदक’ तर पुणे विद्यापीठाने ‘जीवनसाधना गौरव पुरस्कारा’ने त्यांना सन्मानित केले. अशा व्यक्तीला प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्काराने शिवाजी विद्यापीठ सन्मानित करीत आहे.

कणबरकर यांच्या कार्याची दखल घेऊन शाहू पुरस्कार, आदर्श शिक्षक पुरस्कार, कर्मवीर भाऊराव पाटील पुरस्कार, कोल्हापूर भूषण पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

यावेळी प्र–कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रा. रा. कृ. कणबरकर पुरस्कार निवड समितीचे सदस्य प्राचार्य बी. ए. खोत, डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. भालबा विभूते, उपकुलसचिव विलास सोयम, अलोक जत्राटकर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
4 APR 201 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कणबरकर राष्ट्रीय पुरस्कार जब्बार पटेल यांना जाहीर

कोल्हापूर / प्रतिनिधी :

शिवाजी विद्यापीठातर्फे प्रदान करण्यात येणारा प्रतिष्ठेचा प्राचार्य आर. के. कणबरकर राष्ट्रीय पुरस्कार यंदा ज्येष्ठ निर्माते-दिग्दर्शक जब्बार पटेल यांना जाहीर करण्यात आला. १३ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजता पटेल यांना सन्मानपूर्वक पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत ही घोषणा केली.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू (स्व.) प्राचार्य



रा. कृ. कणबरकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार निर्मितीसाठी त्यांच्या कुटुंबीयांनी शिवाजी विद्यापीठाकडे २५ लाख रुपयांची ठेव प्रदान केली आहे. शालिनी कणबरकर यांच्यासमवेत झालेल्या सामंजस्य करारातून शिवाजी विद्यापीठाच्या या माजी कुलगुरूंच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'प्राचार्य ▶▶ पान ७ वर

## कणबरकर राष्ट्रीय पुरस्कार जब्बार पटेल यांना जाहीर

आर. के. कणबरकर पुरस्कारा'ची संयुक्त निर्मिती करण्यात आली. देशातील शैक्षणिक, साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा तसेच अन्य क्षेत्रांत अत्युत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या व्यक्तीला प्राचार्य कणबरकर यांच्या स्मृतिदिनी दरवर्षी हा पुरस्कार देण्यात येतो. रुपये १ लाख ५१ हजार रोख, स्मृतिचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे. यापूर्वी प्रथम पुरस्कार ज्येष्ठ शास्त्रज्ञ भारतरत्न डॉ. सी.एन.आर. राव यांना, तर गतवर्षी दुसरा पुरस्कार रयत शिक्षण संस्थेला प्रदान करण्यात आला. यंदा ज्येष्ठ निर्माते-दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांची निवड करण्यात आली आहे. डॉ. जब्बार पटेल यांच्या भारतीय नाट्य-चित्रपट क्षेत्रातील योगदानाची आणि त्या माध्यमातून भारतीय समाजासाठी केलेल्या सेवेची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी एकमताने निवड केली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शोध समितीचे सदस्य प्राचार्य डॉ. बी. ए. खोत, डॉ. भालबा विभूते, डॉ. एन. व्ही. चिटणीस, उपकुलसचिव विलास सोयम उपस्थित होते.

**डॉ. जब्बार पटेल यांच्याविषयी थोडक्यात...**

पंढरपूर येथे दि. २३ जून, १९४२ रोजी जन्मलेल्या डॉ. जब्बार पटेल यांची एक अत्यंत प्रतिभाशाली आणि सर्जनशील दिग्दर्शक म्हणून ओळख आहे. घाशीराम कोतवाल, तीन पैशांचा तमाशा, अशी पाखरे येती यांसारख्या अजरामर नाटकांद्वारे जब्बार पटेल यांनी मराठी नाट्यसृष्टीला एका वेगळ्या उंचीवर नेण्याचे काम केले. उत्तम अभिनेते, निर्माते आणि प्रयोगशील दिग्दर्शक अशा बहुआयामी कर्तृत्वाच्या डॉ. पटेल यांनी मराठी रंगभूमीच्या वाटचालीत अतुलनीय योगदान दिले आहे. त्याचप्रमाणे सामना, सिंहासन, जैत रे जैत, मुक्ता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, यशवंतराव चव्हाण : बखर एका वादळाची असे मराठीतील संस्मरणीय चित्रपट पटेल यांनी दिग्दर्शित केले आहेत. वेगळा विषय, वेगळा आशय नि वेगळी मांडणी हे पटेल यांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. राजकीय सारीपाटावरचे शह-काटशह मांडणारे सामना, सिंहासन, गो. नी. दांडेकरांच्या कादंबरीवर आधारित जैत रे जैत, मुक्ता, पु. ल. देशपांडेंनी लिहिलेला 'एक होता विदूषक' असे चित्रपट त्यांनी दिग्दर्शित केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील चित्रपट त्यांच्या कारकीर्दीवर कळस चढवणारा ठरला.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 APR 2018
सकाळ

# डॉ. जब्बार पटेल यांना प्राचार्य कणबरकर पुरस्कार

## कुलगुरू डॉ. शिंदे : १३ एप्रिलला वितरण

कोल्हापूर, ता. ३ : शिवाजी विद्यापीठातर्फे देण्यात येणारा प्रतिष्ठेचा प्राचार्य आर. के. कणबरकर राष्ट्रीय पुरस्कार यंदा ज्येष्ठ निर्माते-दिग्दर्शक जब्बार पटेल यांना आज जाहीर झाला. १३ एप्रिलला दुपारी चार वाजता भाषा भवनात हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल, अशी घोषणा कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज केली.

माजी कुलगुरू प्राचार्य रा. कृ. कणबरकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कारनिर्मितीसाठी त्यांच्या कुटुंबीयांनी २५ लाखांची ठेव विद्यापीठाला दिली आहे. शालिनी कणबरकर यांच्यासमवेत झालेल्या करारातून माजी कुलगुरूंच्या


जब्बार पटेल

स्मृतिप्रीत्यर्थ 'प्राचार्य आर.के. कणबरकर पुरस्कारा'ची संयुक्त निर्मिती केली. एक लाख ५१ हजार, स्मृतिचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे. प्रथम पुरस्कार ज्येष्ठ शास्त्रज्ञ भारतरत्न डॉ. सी. एन. आर. राव यांना, तर गतवर्षी रयत शिक्षण संस्थेला या पुरस्काराने गौरविल्याचे डॉ. शिंदे यांनी सांगितले.

'डॉ. पटेल यांच्या योगदानाची दखल' वृत्त पान ८ वर »


# 'डॉ. पटेल यांच्या योगदानाची दखल'

कोल्हापूर : शोध समितीचे सदस्य डॉ. जे. एफ. पाटील म्हणाले, "डॉ. जब्बार पटेल यांच्या नाट्य-चित्रपट क्षेत्रातील योगदानाची आणि त्या माध्यमातून समाजासाठी केलेल्या सेवेची दखल घेऊन त्यांची पुरस्कारासाठी एकमताने निवड केली." या वेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शोध समितीचे सदस्य प्राचार्य डॉ. बी. ए. खोत, डॉ. भालबा विभूते, डॉ. एन. व्ही. चिटणीस, उपकुलसचिव विलास सोयम उपस्थित होते.

**डॉ. जब्बार पटेल यांच्याविषयी...**

पंढरपूर येथे २३ जून १९४२ रोजी जन्मलेल्या डॉ. जब्बार पटेल यांची सर्जनशील दिग्दर्शक ओळख आहे. घाशीराम कोतवाल, तीन पैशांचा तमाशा, अशी पाखरे येती यांसारख्या अजरामर नाटकांद्वारे जब्बार पटेल यांनी मराठी नाट्यसृष्टीला वेगळ्या उंचीवर नेले. उत्तम अभिनेते, निर्माते आणि प्रयोगशील दिग्दर्शक अशा बहुआयामी कर्तृत्वाच्या डॉ. पटेल यांचे मराठी रंगभूमीच्या वाटचालीत अतुलनीय योगदान आहे. सामना, सिंहासन, जैत रे जैत, मुक्ता, डॉ बाबासाहेब आंबेडकर, यशवंतराव चव्हाण : बखर एका वादळाची असे संस्मरणीय चित्रपट पटेल यांनी दिग्दर्शित केले आहेत. डॉ. पटेल यांनी थिएटर ॲकॅडमी नावाच्या प्रायोगिक नाट्यसंस्थेची स्थापना केली आहे. कुसुमाग्रजांवरील लघुपटासह इंडियन थिएटर, लक्ष्मण जोशी, मी एस. एम. असे काही महत्त्वाचे लघुपट आहेत.

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 APR 2018
लोकमत



**गौरव :** कोल्हापुरातील ऋद्धी जगताप हिने सूक्ष्मजीवशास्त्र विषयात प्रथम क्रमांक पटकविल्याबद्दल शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभात ज्येष्ठ अवकाश शास्त्रज्ञ ए. एस. किरणकुमार यांच्या हस्ते सत्कार झाला. यावेळी शेजारी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर उपस्थित होते.

4 APR 2018

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉक्टर- रुग्णांमध्ये सुसंवाद आवश्यक

## प्रकुलगुरु डॉ.शिर्के यांचे प्रतिपादन : जगद्गुरु पंचाचार्य होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय पदवीदान उत्साहात

प्रतिनिधी
कोल्हापूर

वैद्यकीय क्षेत्रामध्ये जलद गतीने बदल होत आहेत. यामुळे अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. यासाठी वैद्यकीय शिक्षणामध्ये अग्रक्रमाने बदल होणे गरजेचे आहे. डॉक्टर व रुग्ण यांच्यामध्ये सुसंवाद अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्रकुलगुरु डॉ.डी.टी.शिर्के यांनी केले.

जगद्गुरु पंचाचार्य एज्युकेशन सोसायटीच्या होमिओपॅथीक वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचा पदवीदान समारंभ रेसिडेन्सी क्लब येथे पार पडला. या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.शिर्के बोलत होते. यावेळी डॉ.शिर्के यांच्याहस्ते होमिओपॅथीक शास्त्रामध्ये पदवी घेतलेल्या ५१ विद्यार्थी, विद्यार्थीनींना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाची सुरूवात दीपप्रज्वलन व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या गीताने झाली. यावेळी बोलताना डॉ. शिर्के म्हणाले, वैद्यकीय शिक्षणामध्ये डॉक्टर व रुग्णांमध्ये सुसंवाद व्हावा, यावर अधिक भर द्यावा, यामुळे दोघांमध्ये विश्वास, आशा व प्रेमाचे नाते तयार होते. होमिओपॅथीक प्रणालीमध्ये रुग्णाची माहितीही सखोल घेतल्यामुळे रुग्ण व डॉक्टर यांचे नाते अधिक दृढ होते. डॉ.शिर्के पुढे म्हणाले, आजही ग्रामीण भागामध्ये होमीओपॅथी डॉक्टरच फॅमिली फिजिशियनची जबाबदारी पार पाडत आहेत. यामुळे शासनाचे होमीओपॅथी डॉक्टरांना अपग्रेड करण्याचे धोरण ग्रामीण भागासाठी खूपच फायदेशीर होणार आहे. होमीओपॅथी औषधप्रणालीचा प्रसार व संशोधन होणे काळाची गरज आहे. यासाठी महाविद्यालयांनी पुढे येवून विद्यापीठाच्या सहकार्याने आंतरराष्ट्रीय संशोधन करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. वैद्यकीय व्यवसाय करताना मूल्ये व तत्वे सांभाळावीत, ज्यामुळे समाजामध्ये आपली ओळख निर्माण होणार आहे. शिवाय आपल्या आरोग्याकडे लक्ष द्यावे, असे सूचित केले.




**कोल्हापूर : होमिओपॅथीक वैद्यकीय महाविद्यालयाच्या पदवीदान समारंभात बोलताना प्रकुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डावीकडून डॉ. सुहास पाटील, प्राचार्य डॉ. राजकुमार पाटील, डॉ. रवीकुमार जाधव, डॉ. फरजाना मुकादम आदी.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ होमिओपॅथीक तज्ज्ञ डॉ. रवीकुमार जाधव होते. यावेळी बोलताना त्यांनी पदवी धारकांनी दुष्परिणामविरहीत होमिओपॅथीमध्येच वैद्यकीय व्यवसाय करावा, इतर औषध प्रणालीचा वापर करू नये. व्यवसाय करताना आपल्या मर्यादा सांभाळा, असे भावनिक आवाहन केले. सूत्रसंचालन पुजा छाबरिया व निशाद शेख यांनी केले. स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य डॉ.राजकुमार पाटील यांनी केले. आरोग्य विद्यापीठाच्या अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ.सुहास पाटील यांनी पदवीधारकांना वैद्यकीय व्यवसायासंबंधीची शपथ दिली. डॉ.फरजाना मुकादम यांनी आभार मानले. यानंतर पदवीधारकांनी महाविद्यालयाचे प्राध्यापक व पालक यांच्याविषयी आदरयुक्त भावना व्यक्त केल्या.

यावेळी डॉ.एस.आर.पाटील, डॉ.दिलीप परांजपे, डॉ. अर्चना राणा, डॉ. एम. आर.कुलकर्णी, डॉ. डी. एच. माने, डॉ. एस. सी. हिरेमठ यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक, विद्यार्थी उपस्थित होते.

4 APR 2018 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# आंबेडकर जयंतीदिनी विद्यापीठात निबंध स्पर्धा

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांची माहिती

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र यांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले आहे.

निबंध स्पर्धेसाठी 'राष्ट्रनिर्माता डॉ. बाबासाहेब आंबेडकर', 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि वैज्ञानिक दृष्टीकोन', 'अर्थशास्त्रज्ञ डॉ.बाबासाहेब आंबेडकर',



'डॉ.बाबासाहेब आंबेडकर आज असते तर...', 'धोरणकर्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर' या विषयांची निवड केली आहे. ३ हजार शब्दात निबंध स्वत:च्या हस्ताक्षरात लिहून १२ एप्रिल दुपारी ४ वाजेपर्यंत केंद्रात जमा करावयाचा आहे. प्रथम क्रमांकास एक हजार रुपये व प्रमाणपत्र, द्वितीय क्रमांकास सातशे पन्नास रुपये व प्रमाणपत्र, व तृतीय क्रमांकास पाचशे रुपये व प्रमाणपत्र अशी पारितोषिके दिली जातील.

पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेसाठी 'राष्ट्रनिर्माता डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि राष्ट्रनायक राजर्षी छ.शाहू महाराज', 'छ.शिवाजी महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि वैज्ञानिक दृष्टीकोन', 'आधुनिकतेचे प्रतीक डॉ. बाबासाहेब आंबेडकर", 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक लोकशाही" या विषयांची निवड केली आहे. या स्पर्धेसाठी पोस्टर एक मीटर लांब व एक मीटर रुंद असावे. स्पर्धेत भाग घेण्यासाठी इच्छुकांनी १२ एप्रिलपर्यंत डॉ.आंबेडकर संशोधन व विकास केंद्रात नावनोंदणी करावी. स्पर्धकाने १३ एप्रिल रोजी सकाळी १०.३० वा. डॉ. आंबेडकर संशोधन व विकास केंद्रात पोस्टरसह उपस्थित राहणे आवश्यक आहे. या स्पर्धेतील प्रथम क्रमांकास एक हजार व प्रमाणपत्र, द्वितीय क्रमांकास सातशे पन्नास रूपये व प्रमाणपत्र, तृतीय क्रमांकास पाचशे रुपये व प्रमाणपत्र अशी पारितोषिके दिली जातील. दोन्ही स्पर्धांसाठी परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील. अधिक माहितीसाठी केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहनही डॉ. महाजन यांनी केले आहे.